आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 पोष्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष ४ थे. अंक २ रा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१ ऑगष्ट २०१४ पाने ८ किंमत २० रूपये

## एलपीजी गॅस ग्राहकांचे हक्क !






## गॅस एजन्सी चालकांची मुजोरी थांबवा आरटीआय वापरा,काळा बाजार रोखा

## क्लास वन अधिकारी व आय कर भरणाऱ्या उच्चभ्रुंची एलपीजी गॅस सबसीडी बंद करा.गरीबांना दिलासा द्या

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक **नागरिक अधिकार**

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

किरण मांजरेकर (मुंबई)
रामशंकर सरोज (मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
हरिभाऊ माटेटवार (नागपूर)
सुशांत चोणकर (रायगड)
अभिजित पटवा (कोल्हापूर)
प्रीतम यादव (सातारा)
संभाजी सावंत (सांगली)
इब्राहिम पठाण (औरंगाबाद)
मोतीराम काळे (नांदेड)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

: web site :
rtimahasangh.weebly.com

## संपादकीय...........

# श्रीमंताची एलपीजी सबसीडी बंद करा गरीबांना गॅस सिलेंडर स्वस्त करा


मुकेश अंबानी हे भारतातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती आहेत.त्यांच्या घरी जो एलपीजी सिलेंडर जातो वा पाईप गॅस मधून जातो त्यावरही सरकार प्रति सिलेंडर किंवा प्रत्येक चौदा किलो गॅस मागे ४५० रूपयांची सवलत देते.तसेच यादेशातील सर्वांत गरीब अशा शेतमजूर वा बांधकाम मजूरांनाही प्रति सिलेंडर ४५० रूपये इतकीच सवलत मिळते.गॅस सबसिडीच्या बाबतीत सरकारला मुकेश अंबानी आणि गरीब शेतमजूर सारखेच वाटतात.मुकेश अंबानी येथे भारतीय श्रीमंताचे प्रतिक म्हणून घेतले आहेत.अशा लाखो अतिश्रीमंत कुटुंबाना सरकार डोळे झाकून करोडो रूपयांचा अनुदानित गॅस पुरवित आहे.श्रीमंताच्या खिशात त्यांना मुळीच गरज नसताना करोडो रूपयांची सबसीडी टाकायची आणि वरुन गॅस कंपन्या तोटयात आहेत म्हणून गळा काढायचा.आणि गॅस सिलेंडरच्या किंमती वाढवत राहयचे आणि गरीबांच्या खिसा लूटत राहयचा असला दांभिकपणा सरकार करीत आहे.स्वयंपाकाचा गॅस ही अतिआवश्यक वस्तू आहे.गरीबांना ती किफायतशीर व परवडेबल ठेवणे हे कल्याणकारी सराकरचे कर्त्यव्य आहे.स्वयंपाकाचा गॅस हा क्रयशक्ती अमाप असणाऱ्याश्रीमतांना थोडा महाग दिला तरी काही त्यांच्यावर आकाश कोसळणार नाही.आयकर भरणारे श्रीमंत उच्चभ्रू लोक आणि क्लास वन अधिकारी यांची एलपीजी सबसीडी ताबडतोब बंद केली पाहिजे.किंवा ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्ना ५ लाखापेक्षा अधिक असेल त्यांना सबसीडी बंद असे धोरण आखले तर देशातील किमान २० ते २५ टक्के एलपीजी ग्राहक सबसीडीच्या बाहेर जातील आणि गरीबांना सवलतीच्या दरातील गॅस अधिक काळ योग्य त्या दरात पुरविणे तेल कंपन्यांना शक्य होईल.हा सरळ सोपा परंतु कठोर उपाय जर सरकार राबविणार नसेल तर हे सरकार श्रीमंत धार्जिणे व गरीबांचा बळी घेणारे सरकार आहे हे सिद्ध होईल.

आपला देश हा कल्याणकारी लोकशाही मानतो.संविधानातही गरीब जनतेचा सन्मानाने जगण्याचा हक्क सांगितला आहे.पण जेव्हा गरीबांच्या वाट्याचा सन्मान निधी जेव्हा निर्लज्जपणे श्रीमंताच्या खिशात ढकलला जातो.आणि श्रीमंतही तो निधी निर्लज्जपणे आपल्या खिशात ओढून घेतो.तेव्हा एकाक्षणात एकमय लोक ही संकल्पना निकालात निघते आणि नागरिक म्हणून देशबांधवांच्या परस्परांबद्द्लच्या आस्थेवर घाव पडतो.मग त्यातून न सुटणाऱ्या विविध समस्यांचा गुंता गुंतत जातो. म्हणून सरकारने अधिक जागरुक व कर्त्यव्यशील राहून गरीबांना अधिक सोई व सवलती मिळतील आणि त्याना सन्मानाने जगण्याचा एक सविस्तर आवकाश कसा मिळेल हे पाहिजे पाहिजे त्यासाठी खूर्चीची लाचारी सोडून कठोर निर्णय घ्यावे लागतील.

खूर्ची च्या मोहापायी जर सरकार गरीबांना वाऱ्यावर सोडून उच्च मध्यमवर्गीयाची मर्जी राखील तर अशा शासनाला गरीब जनता थारा देत नाही.असा भारतीय राजकारणाचा इतिहास आहे.तेव्हा शासनाने गरीबांची काळजी करावी.श्रीमंत जगण्याच्या मर्यादेपर्यंत स्वत:ची काळजी घ्यायला समर्थ आहेत.

तेव्हा सरकारने अतिश्रीमंत व उच्च अधिकारी अशा सर्व उच्चभ्रू लोकांची एलपीजी सबसीडी काढून गरीबांचा गॅस अधीक स्वस्त व दिर्घकाळ स्वस्त ठेवला पाहिजे.यामुळे तेलकंपन्यांचे नुकसानही होणार नाही.तसेच देशातील गरीबांना एक श्वास्वत व मुबलक इंधन पर्याय मिळेल सरकारने असे कठोर निर्णय नाही घेतले तर समस्या चिताजनक होत राहिल तेव्हा सावधान !

# एलपीजी गॅस ग्राहकांचे हक्क !




- गॅस कनेक्शन घेताना शेगडी घेणे बंधनकारक नाही !
- सिलेंडर घेताना ते वजनकाट्यावर तोलून घ्या
- कॅश अॅण्ड कॅरी केल्यास १५ रूपये रिबेट मागा
- दोन बुकींग दरम्यान २१ दिवस थांबण्याची गरज नाही.
- दोन वर्षातून एकदा शेगडी ट्युब रेग्युलेटर तपासणी आवश्यक
- कोणतीही तक्रार असल्यास गॅसकंपनीच्या अधिकाऱ्यास संपर्क करा. वेबसाईटवरुन ऑनलाईन तक्रार करा.

http://www.hindustanpetroleum.com/LPGHome
http://www.ebharatgas.com/
http://indane.co.in/

प्रश्न : नवीन गॅस कनेक्शन मिळणेकरिता काय प्रक्रिया आहे ?

उत्तर : आपल्या निवासाच्या जवळ असलेल्या घरगुती गॅस वितरकाकडे नवीन गॅस कनेक्शनसाठी नोंदणी करता येईल. तसेच नवीन गॅस कनेक्शनकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. भारत पेट्रोलियम कंपनीसाठी **www.bharatpetroleum.com** इंडियन ऑईल कंपनीसाठी **spandan.indianoil.co.in** व पेट्रोलियम कंपनीसाठी **www.hindustanpetroleum.com** या लिंकचा वापर करावा.

प्रश्न : नवीन घरगुती गॅस कनेक्शन मिळणेसाठी किती रक्कम भरावी लागेल ?

उत्तर : १ एका गॅस सिलेंडर करिता - रूपये १,४५०/- (अनामत रक्कम)
२. दोन गॅस सिलेंडर करिता - रूपये १,४५०/- प्रती सिलेंडर याप्रमाणे २,९०० /- (अनामत रक्कम)
३. रेग्युलेटरसाठी - रूपये १५०/- (अनामत रक्कम) या सर्व भरलेल्या पैशाची पावती मिळते. या किंमती जूलै २०१४ अखेरच्या आहेत. यापेक्षा अधिक रकमेची मागणी केली असल्यास गॅस कंपनीच्या वेबसाईटवर जाऊन रक्कमेची खातरजमा करावी.

प्रश्न : के.वाय.सी.म्हणजे काय ?

उत्तर : के.वाय.सी. **.(Know Your Consumer)** म्हणजे ग्राहकाचे निवासाचा व ओळखीबाबतची माहिती नमूद असलेला तसेच ग्राहकाचे वैयक्तिक माहितीचा तपशील असलेला फॉर्म आहे

प्रश्न : के.वाय.सी. फॉर्म भरणे आवश्यक आहे का ?

उत्तर : आपणाकडे एकापेक्षा जास्त घरगुती गॅस कनेक्शन किंवा वेगवेगळया कंपनीची एकापेक्षा जास्त घरगुती गॅस कनेक्शन असल्यास आपणास के.वाय.सी.फॉर्म भरणे आवश्यक आहे.त्यासाठी निवासाचे व ओळखपत्राचे पुराव्यासह फॉर्म भरणे आवश्यक आहे.

प्रश्न : के.वाय.सी. फॉर्म कोठे मिळेल ?

उत्तर : के.वाय.सी. फॉर्म आपले विभागातील वितरकाकडे मोफत उपलब्ध आहेत.

खटल्यामध्ये सत्याचा शोध घेण्यापेक्षा, भांडण मिटविणे ही प्राथमिकता असेल तर असे न्यायदान पाखंड असते.

प्रश्न : नवीन गॅस कनेक्शन घेतेवेळी गॅस शेगडी व गॅस विषयक इतर साहित्य वितरकाकडून घेणे बंधनकारक आहे का ?

उत्तर : नाही तुम्ही गॅस वितरकाव्यतिरिक्त अन्य दुकानातून ISI प्रमाणित गॅस शेगडी खरेदी करू शकता.तुम्ही बाहेरून शेगडी घेतल्यास गॅस एजन्सीचा कर्मचारी तुमच्या घरी येऊन व्हेरीफिकेशन करतो त्यांची योग्य ती फिस भरावी व पावती घ्यावी.गॅस एजन्सीकडून शेगडी घेणे बंधनकारक नाही असा फलक एजन्सीच्या कार्यालयात दर्शनी भागात मराठी भाषेतून लावला पाहिजे असा शासन आदेश आहे.गॅस एजन्सीच्या ऑफिसमध्ये गॅस वितरकांचे नाव पत्ता संपर्क क्रमांक गॅस / तेल कंपनीच्या अधिकाऱ्याचे नाव पत्ता संपर्क क्रमांक ई मेल अ‍ॅड्रेस इत्यादी तपशील दर्शनी भागावर लावणे बंधनकारक आहे.जर एजन्सी चालक तुम्हाला शेगडी घेण्याची सक्ती करीत असेल तर तुम्ही तेल कपंनीच्या अधिकाऱ्यांकडे तसेच कंपनीच्या बेवसाईटवर जाऊन ऑनलाईन तक्रार नोंदवावी.

प्रश्न : गॅस सिलेंडरमध्ये रात्री / सुट्टीचे दिवशी गळती झाल्यास संपर्क कोठे साधावा ?

उत्तर : गॅस सिलेंडरमध्ये रात्री / सुट्टीचे दिवशी गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यास तुम्ही राहत असलेल्या ठिकाणचे तात्काळ मदत केंद्र ( Emergency Service Cell (ESC)) येथे संपर्क साधावा. गॅस रिफील पावतीचे मागील बाजूस तात्काळ मदत केंद्राचे ( Emergency Service Cell (ESC)) दूरध्वनी क्रमांक नमूद आहेत.

प्रश्न : घरगुती गॅस सिलेंडर वितरण व सिलेंडर काळया बाजाराशी संबंधित तक्रारीसाठी कोठे संपर्क साधावा ?

उत्तर : घरगुती गॅस सिलेंडर वितरण व सिलेंडर काळया बाजाराशी संबंधित तक्रारीसाठी एल.पी.जी.ग्राहक सहाय्यता केंद्र (LPG Customer Service Cell) किंवा जवळचे एल.पी.जी. कंपनीचे क्षेत्रिय कार्यालयात संपर्क साधावा. तसेच आपण तक्रार ऑनलाईन दाखल करू शकता किंवा कंपनीच्या हेल्पलाइन : ऑइल इंडस्ट्री : 1800 2333 555 (टोल फ्री), भारत पेट्रोलियम : 020-26345141/42, 26342176, हिंदुस्थान पेट्रोलियम : 020-26213104/05 आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन : 020-26332661 संपर्क साधू शकता. तसेच आपल्या तालुक्यातील शिधावाटप अधिकारी वा तहसील कार्यालयातील पूरवठा अधिकारी यांच्याकडेही तक्रार करू शकता.

प्रश्न : घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा मोटार सायकल, गिझर इत्यादी करिता वापर करता येईल का ?

उत्तर : एल.पी.जी. नियंत्रण कायदान्वये घरगुती वापराचे गॅस सिलेंडरचा मोटार सायकल, गिझर इत्यादी करिता वापर करण्यास प्रतिबंध करणेत आला आहे. मोटार सायकलमध्ये Auto LPG चा वापर करू शकता. तथापि, घरगुती सिलेंडरचा वापर स्वयंपाकाचे इंधन (cooking fuel) म्हणूनच मर्यादित आहे.

प्रश्न : ग्राहकांना गॅस सिलेंडर घरपोच आणून देणे वितरकांना बंधनकारक आहे का ?

उत्तर : होय, वितरकांमार्फत गॅस सिलेंडर ग्राहकांचे राहत्या घरी पोहचविण्यात येतो. याकरिता स्वतंत्र शुल्क आकरणेत येत नाही. वितरकाच्या कार्यक्षेत्राबाहेर सिलेंडर पोहचविण्या करिता निर्धारित भाडे आकरले जाते.

प्रश्न :सिलेंडरमध्ये कमी गॅस भरलेला कसे ओळखावे ? याची खातरजमा कशी करावी ?

उत्ती : गॅस सिलेंडर घरी पोहचविणाऱ्या कर्मचाऱ्याकडे वजने मापे निरिक्षकांनी प्रमाणित करून दिलेला वजन काटा असणे बंधनकारक आहे. माझ्याकडे वजनकाटा नाही असे कायद्याने तो म्हणू शकत नाही.घरगुती वापराच्या सिलेंडरमधील सिलेंडर मधील गॅस चे वजन १४.२ किलो इतके असते.आपण घेत असलेल्या सिलेंडरमध्ये खरेच १४.२ किलो गॅस भरलेला आहे काय याची खातरजमा करून घ्यावी.रिकाम्या सिर्लेडरचे वजन सिर्लेडरच्या वरच्या भागावर प्रिंट केलेले असते.सिलेंडरचे रिकामे वजन अधिक १४.२ किलो.म्हणजेच सिलेंडरचे एकूण वजन भरेल.भरलेल्या सिलेंडरचे एकूण वजन वजा सिलेंडरच्या रिकाम्या टाकीचे वजन बरोबर सिलेंडरमधील एकूण गॅस चे वजन हे वजन १४ किलो २०० ग्रॅम इतके आले पाहिजे.यात साधारणत १५० ग्रॅम चा फरक प्रमाण मानला जातो.जर सिलेंडरमधील गॅस चे वजन १४ किलो ५० ग्रॅम पेक्षा कमी असेल तर असा सिलेंडर कमी वजनाचा सिलेंडर ग्राहकांनी घेऊ नये.तो बदलून योग्य त्या वजनाचा दुसरा सिलेंडर मागावा.

बलपूर्वक कायदा राबवून नव्हे तर समाजाच्या शहाणपणाची पातळी वाढवून खरा सामाजिक सलोखा निर्माण होत असतो.

प्रश्न : कॅश अन्ड कॅरी म्हणजे काय ? आपण स्वत: सिलेंडर घेऊन आलो तर वाहतूक खर्च म्हणून आपणास आकारले जाणारे पैसे परत मिळतात काय?

उत्तर : जेव्हा कधी कधी आपण गॅस एजन्सीच्या गोदामावर /कार्यालयात जाऊन आपण स्वत: पैसे देऊन भरलेला सिलेंडर घेऊन येतो.यास कॅश ॲण्ड कॅरी म्हणतात.अशा वेळी ग्राहकांना गॅस सिलेंडरच्या एकूण किंमतीमध्ये वाहतूक खर्च वजा केला पाहिजे.म्हणजेच १५ रूपये वाहतूक सवलत मूल्य म्हणून कमी घेतले पाहिजेत.आपण कष्ट करून पैसे कमावतो. तेव्हा कॅश ॲण्ड कॅरी करताना एजन्सीला हे १५ रूपये कमी द्यावेत.

प्रश्न : घरगुती गॅस सिलेंडरचे दोन बुकींगमधील कालावधी किती दिवासचा असेल ?

उत्तर : घरगुती गॅस सिलेंडरचे दोन बुकींगमधील कालावधी ग्राहकाच्या गरजेनुसार असेल.दोन बुकींग मधील अंतर किमान १८ दिवस किंवा २१ दिवसाचे असेत असे बऱ्याच वेळा गॅस एजन्सीतून सांगितले जाते.पंरतु गॅस ॲण्ड ऑईल खात्याच्या कायद्याप्रमाणे वा गॅस कंपनींच्या नियमाप्रमाणे असे कोणतेही नियमाचे बंधन नाही. आपल्या गरजेनुसार आपण बुकींग करू शकतो.

प्रश्न : सिलेंडरची एक्सपायरी डेट असते काय ? ती कशी ओळखावी ?

उत्तर : घरगुती गॅस चा सिलेंडर हा भक्कम अशा धातू पासून व पूर्ण सुरक्षीत राहिल असा बनविलेला असतो.परंतु सिलेंडर भरल्यानंतर अतिल गॅसचा सिलेंडरवर खूप मोठा दाब असतो.त्यामुळे सिलेंडर टाकी तयार केल्यानंतर वारंवार रिफिल करण्यासाठी जास्तीत जास्त किती दिवस वापरता येईल याची एक काल मर्यादा ठरवलेली असते.या अधिकतम कालावधीस एक्सपायरी डेट म्हणतात.ही काल मर्यादा ए. (जाने.फेब्रु.माचे )बी.(एप्रील.मे.जून) सी.(जूलै आगष्ट सप्टें) डी.(ऑक्टो नोव्हे डिसें)असे गट व पुढे वर्ष अशी असते.सिलेंडरच्या टाकीवर वरच्या तीन पटच्याच्या अतिल एका पट्टीवर सिलेंडरची एक्सापायरी डेट नोंदवलेली असते.उदा.जर ती कालमर्यादा ए-१७ अशी असेल तर तो सिर्लेंडर मार्च २०१७ पर्यंत वापरासाठी सुरक्षित आहे.असे समजावे. आपल्या घरी नवीन सिलेंडर घेताना त्यावरील एक्सपायरी डेट पाहून घ्यावी.एक्सपायरी संपलेला सिलेंडर घेऊ नये.

प्रश्न : गॅस सिलेंडरचा नुकसानी अपघात किंवा स्फोट झाल्यास विमा सरंक्षण असते काय ?

उत्तर : आपण जेव्हा गॅस सिलेंडरची रक्कम भरतो त्यातील काही रक्कम ही गॅस कंपनीकडून सिलेंडरच्या स्फोटामुळे होणाऱ्या सांभाव्य दुर्घटनेतील नुकसान भरपाईचा विमा म्हणून विमा कंपनीकडे भरलेली असते.यास सार्वजनिक दायीत्व पॉलीसी म्हणतात.त्यामुळे अशा दुर्घेटनेतून होणारी नुकसान भरपाई ग्राहक गॅस कंपनी कडे मागू शकतो.योग्य त्या प्रक्रियेनंतर गॅस कंपनी जर गॅस कंपनी जबाबदार ठरत असेल तर अशी नुकसान भरपाई मिळू शकते.ही मर्यादा मालमत्ता नुकसानीच्या बाबतीत अधिकतम ४० रूपये आहे.तसेच मृत्यू दुर्घटनेच्या बाबतीत अधिकतम ५० लाख रूपये इतकी आहे.

प्रश्न : सिलेंडर जोडणीचा / ग्राहकांचा मालकी हक्क बदलू शकतो काय ?

उत्तर : होय चालू ग्राहकांच्या मृत्यू नंतर काही कागदपत्रांच्या पूर्तते नंतर ग्राहकांच्या एका वारसाच्या नावे जोडणीचा मालकी हक्क घेता येतो.तसेच आपल्या कुटुंबातील नात्यामध्येही ना हरकत व अन्य कागदपत्राच्या पूर्ततेनंतर गॅस जोडणीचा मालकी हक्क बदलता येतो.

प्रश्न : आपल्या घरी गॅस कंपनी किंवा एजन्सीचे कर्मचारी तपासणी येतात व फार मोठी रक्कम आकारतात.यावर उपाय काय ?

उत्तर : प्रत्येक ग्राहकांनी किमान दोन वर्षातून एकदा गॅस शेगडी, रबरी ट्युब, रेग्लुलेटर यांची तपासणी करून घेणे हे नियमाप्रमाणे बंधनकारक आहे. परंतु जेव्हा गॅस कंपनीचे लोक तपासणी साठी घरी येतात तेव्हा त्यांचे आय कार्ड, तपासणी अधिकार पत्र याची विचारणा करावी.गॅस एजन्सीकडे फोंन करून ते अधिकृत प्रतिनिधी आहेत काय ? याची खात्री करून घ्यावी.ते जर अधिकृत असतील तरच त्यांना तपासणी करू द्यावी.तपासणी नंतर शेगडी दुरूस्ती , रबर ट्युब बदलणे किंवा इतर किरकोळ दुरस्ती यांची एकूण किती रक्कम आकारली त्याचे बील घ्यावे.त्यांना रोख पैसे देऊ नयेत.हे बील जेव्हा ग्राहक पुढच्या वेळेचा सिलेंडर भरून घेईन त्यावेळसच्या एकूण बील आकारणीत आकारण्यात येईल तेव्हा चुकते करावे.त्यामुळे दुरूस्तीप्रतिनिधीनी ग्राहकांना काय सेवा दिली व त्याचे शुल्क किती आकारले यांची अधिकृत नोंद राहते.व ग्राहकांची लुबाडणूक होत नाही. ऑईल आणि गॅस खात्याने यासाठी वरील प्रमाणे नियमच केलेला आहे.

जितके जास्त कायदे तितकीच न्यायाची संभावना कमी,कायद्याच्या जंजाळात एक अदृश्य अनागोंदी नांदत असते.

# गॅस ग्राहकांची अडवणूक करणाऱ्या गॅस एजन्सी चालकाविरोधात आरटीआय वापरा !

हा केवळ मार्गदर्शक नमूना आहे आवश्यक तेथे कार्यकर्त्यांनी सोईनुसार बदल करावा.

केंद्रीय माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति, जनमाहिती अधिकारी रिजनल जनरल ऑफिस

भारत गॅस/ इंडेन गॅस /हिदुस्थान गॅस

(आपल्या विभागातील जनमाहिती अधिकारी यांचा पत्ता संबंधीत कंपनीच्या बेवसाईटवर )

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : ------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :------------------------------------------------

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :(विषय व कालावधी)

------------------ या गॅस एजन्सीची खालील प्रमाणे मुद्येनिहाय माहिती मिळणेबाबत

अ) ------------------ या गॅस एजन्सायांचे कार्यक्षेत्र किती व कोणते आहे ? या कार्यक्षेत्राचा नकाशा किंवा प्लॉन द्यावा.------------------ या गॅस एजन्सीच्या मालकांचे नाव व पत्ता तसेच गॅस एजन्सीज परवाना केव्हा मिळाला तो दिनांक व परवाना घेताना एजन्सीज मालकांने पूरावे म्हणून जोडलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती मिळाव्यात.

ब) ------------------ या गॅस एजन्सा सन २०१३ या पूर्ण वर्षात त्यांच्याकडील प्रत्येक ग्राहकांना किती वेळा व कोणत्या दिनांकास गॅस सिलेंडर डिलेव्हरी केली ? या माहितीचा संपूर्ण कॉम्प्यूटर डाटा असणारी सिडी द्यावी.

क) ------------------ या गॅस एजन्सा यांचे सिलेंडर साठवण्याचे गोदामाच पत्ता द्यावा.तसेच गोदामाच्या जागेची एकूण लांबी व रूंदी तसेच गोदाम जागेतील एकूण बांधकामाची लांबी व रूंदी द्यावी.गोदामाचा मंजूर नकाशा किंवा प्लॉन द्यावा.

ड) ------------------ या गॅस एजन्सा यांना प्रत्येक सिलेंडर मागे किती रूपये कमीशन मिळते ? प्रत्येक ग्राहकांना घरपोच सिलेंडर पूरविणे गॅस एजन्सीसाठी बंधनकारक आहे काय ? जर ग्राहकांनी गोडावून वरून किंवा एजन्सीवर येऊन सिलेंडर नेला तर किती रूपये सूट किंवा सवलत मिळते ?सन २०१४ या वर्षात गोडावून डिलेवरी झालेल्या किती ग्राहकांची नोंद एजन्सीच्या रेकार्डवर झाली आहे.ग्राहकसंख्या द्यावी.

ज ) ------------------ या गॅस एजन्सी यांच्याकडून या २०१३-१४ या वर्षात यांच्याकडून शेगडी / लायटर / किंवा अन्य साहित्य घेतलेल्या ग्राहकांची नाव व पत्ते द्यावेत.गॅस एजन्सीने शेगडी रबरी टयुब लायटर व इतर अक्सेसरीज विक्री करण्यासाठी शॉप अक्ट प्रमाणपत्र वॅट नोंदणी केली आहे काय ? नसल्यास का नाही ? विक्रीकर व व्यवसाय कर भरल्याच्या नोंदी असणारे झेरॉक्स पेपर द्यावेत.

४) माहिती स्पीड व रजिस्टर टपालाने हवी की व्यक्तिश : स्पीड पोष्टाने / व्यक्तीश माहिती हवी आहे

५) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (सोबत १० रूपयाची पोस्टल ऑर्डर जोडली आहे)

ठिकाण :------------ अर्जदाराची सही

दिनांक :-------------- मोबाईल. -----------

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ----------------------------------------------------------

पत्ता :----------------------------------------------------------

-------------------------------- पीनकोड

मोबाईल :

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक आणि विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी ओळखपत्र खर्च १७०रूपये पोष्टेज खर्च ८० रूपये आणि १५० रूपयांची तीन पुस्तके व स्थानिक शाखा शुल्क १०० रूपये असे एकत्रीत ५०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व नागरिक अधिकार विषयक पुस्तके मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावीत.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीनृ तसेच माहिती अधिकार महासंघाच्या कार्यकर्ता आचारसंहितेचे काटेकोर पालन करीन.कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणार नाही. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

सभासद कोड नंबर

### कार्यालयीन उपयोगासाठी

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१४ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१५
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- सभासद प्रक्रिया शुल्क मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली

**आपण वेबसाईट rtimahasangh.weebly.com वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता**

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा. ओळखपत्र खर्च / पोष्टेज व नागरिक अधिकार प्रकाशनांची तीन पुस्तके असे एकत्रीत मुल्य ५०० रूपये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून खाते नंबर **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने भरावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर सभासद ओळखपत्र व पुस्तके पाठवली जातील.सभासदांना महासंघाच्या वेबसाईडवरून **web site : rtimahasangh.weebly.com** ऑनलाईन फार्म भरता येईल.या अंकात पान ७ वर दिलेला सभासद फॉर्म झेरॉक्स करून सविस्तर भरून फोटो चिकटवून तो सायबर कॅफेमधून स्कॅन करूनही **mediamansubhash@gmail.com** या ई मेलवरूनही पाठविल्यास अधिक सोईचे होईल.तरी जास्तीत जास्त माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सभासद व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

पोस्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

प्रति,

पाठविणार
पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-९६, सेक्टर -१२ खारघर
नवी मुंबई ४१०२१०
महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. रजि नं. MAHMAR/2011/40781